**नि.दि.मु.क्र.१४७/२०१४**
**प्रशांत वि हणमंत**
**नि.क्र. ५३ पुढे सुरु**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा पुढील उलटतपास शपथेवर सुरु**
**उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. डी.एस. शिंदे**

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, महादेव गेणु पोळ यांना गट क्र.१२४९ ही मिळकत सन १९७६-१९७७ मध्ये धोम धरणग्रस्त म्हणुन पुर्नरवसनात मिळाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, महादेव पोळ यांच्या मृत्युनंतर सदरील मिळकत रघुनाथ पोळ यांच्या नावे वारस म्हणुन झाली. हे म्हणणे खरे आहे की, रघुनाथ यांच्या दिनांक १५.१२.२०१० च्या मृत्युनंतर सदरील मिळकत त्यांच्या वारसांच्या नावे म्हणजेच प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या नावे झाली. रघुनाथ यांना सदरील मिळकतीतील १/६ म्हणजेच १४ गुंठे हिस्सा होता याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २.०५.१९९७ रोजीच्या साठेखतानुसार त्यातील व्यवहार ३ वर्षाच्या आत रघुनाथ यांना पुर्ण करावयाचा होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या साठेखतात त्यात नमुद असलेली रक्कम जर ३ वर्षाच्या आत व्यवहार पुर्ण केला नाही तर परत करावयाची होती. आता मला नि.क्र. ६२ वरील दिनांक ०२.०५.१९९७ रोजीचा साठेखताचा दस्त दाखवण्यात आला. त्यातील पान क्र.७ वरील परिच्छेद नं.३ मध्ये आर्टीकल अ म्हणुन अधोरेखांकीत केलेला भाग व त्यातील नमुद असलेला मजकुर बरोबर नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरील दस्तात नमुद असलेला ३ वर्षाचा कालावधी दिनांक ३.०५.२००० रोजी संपुष्टात आला होता. हे म्हणणे खरे आहे की दिनांक ०३.०५.२००० रोजी अथवा तदनंतर आम्ही रघुनाथ यांना नोटीस पाठवुन त्यातील व्यवहार ३ वर्षाच्या कालावधीच्या आत पुर्ण झाला नसला या सबबीखाली रद्द झाला असे कळविले नव्हते.

**१३.** दिनांक ११.०६.२००४ रोजी शासनाने अधिसुचना काढुन सन १९७६ ते १९८६ या कालावधीत धरणग्रस्तांना पुर्नरवसनात मिळालेल्या जमीनीच्या महसुल रेकॉर्डला त्यांची भोगवटादार १ अशी नोंद व्हावी असे आदेश दिल्याचे मला सांगता येणार नाही. सन २००४ नंतर त्यामुळे साठेखतातील नमुद व्यवहार पुर्ण होण्याकरिता शासनाच्या पुर्व परवानगीची कोणतीही आवश्यकता राहीली नव्हती याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.६२ मधील नमुद मिळकत आजरोजी आमच्या ताब्यात नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या दस्तातील नमुद मिळकतीच्या उत्तरेकडील भाग पुष्पा जायगुडे यांच्या ताब्यात आहे.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १७.०५.२०१४ ची नोटीस देण्यापूर्वी प्रतिवादी त्या व्यवहारात असलेली रक्कम परत करण्याकरिता माझे पती मंगलसिंह यांच्याकडे आले होते. साक्षीदार पुन्हाहुन सांगते की, त्यावेळी प्रतिवादी रक्कम घेवुन आले नव्हते तर केवळ त्याबाबत सांगण्याकरिता आले होते. त्यावेळी मंगलसिंह यांनी २२ लाख रुपये दिले तरच मी ती जमीन सोडेन असे प्रतिवादीस म्हटल्याचे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०८.०६.२०१४ रोजीची नोटीस वादी तर्फे प्रसिध्द केल्यानंतर प्रतिवादी यांनी गट क्र.१२४९ ही मिळकत कधीही विक्रीस काढलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी दिनांक २७.०५.२०१४ रोजी दिलेल्या नोटीसीला आम्हा वादींनी दिनांक १९.०६.२०१४ रोजी दिलेल्या उत्तरातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २७.०५.२०१४ रोजीच्या प्रतिवादींनी दिलेल्या नोटीसीतील मजकुर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, धोम विकास कार्यकारी सेवा सोसायटी यांना प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी म्हणुन सामील केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती यांना प्रकरणाची संपुर्ण माहीती असतानाही जाणीवपुर्वक त्यांनी वादी म्हणुन प्रस्तुतचा दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्हा वादींनी दाखल केलेला प्रस्तुतचा दावा हा खोटा आहे व साठेखताचा कालावधी हा १४ वर्षांपुर्वीच संपला असल्याने तसा दावा दाखल करण्याचा आम्हाला अधिकारच उरलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासाचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.09.19 13:18:55 +0530

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- १९.०९.२०२५. २रे सह दिवाणी न्यायाधीश वाई.